


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com





वर्ष : ०५ | अंक : २८१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२३ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुंबई ते गोवा प्रवास ८ तासांत; १३ जिल्ह्यांमधून शक्तीपीठ महामार्ग

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, पुणे :** शक्तीपीठ महामार्गाच्या नव्या आराखड्यानुसार महामार्गाची लांबी ५४ किलोमीटरने वाढवण्यात आली असून प्रकल्पाचा खर्च आता १ लाख कोटींपर्यंत पोहोचला आहे. यापूर्वी १२ जिल्ह्यांमधून जाणाऱ्या महामार्गामध्ये सातारा जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला. त्यानंतर ही संख्या १३ झाली. साताऱ्याचा समावेश केल्यामुळे महामार्गाची प्रमुख शहरं आणि महामार्गांशी कनेक्टीव्हीटी वाढणार आहे.




**कसा असेल मार्ग?**

नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्गाला फेब्रुवारी २०२४मध्ये मंजुरी मिळाली होती. पण कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे ऑक्टोबर २०२४मध्ये हा आराखडा रद्द करण्यात आला. त्यानंतर ऑगस्ट २०२५ मध्ये महायुती सरकारने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पर्यायी आराखडा तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर काही भागांना वगळून नवा मार्ग प्रस्तावित करण्यात आला. यामध्ये १३ जिल्हे आणि ४० तालुक्यांचा समावेश आहे. वर्धा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमधून हा मार्ग जाणार आहे. महाराष्ट्रातील माहुर, तुळजापूरसारख्या महत्त्वाच्या २१ शक्तीपीठांना हा मार्ग जोडणार आहे.

**कोणत्या महामार्गांना जोडणार?**

साताऱ्याचा समावेश केल्यामुळे हा मार्ग मुंबई-बंगळुरू महामार्गाला (छक्४८)ला जोडणार आहे. जिल्ह्यातील कराड शहरापासून हे केवळ ३६ किलोमीटर अंतरावर असल्यामुळे साताऱ्यामधील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. त्याशिवाय, हे ठिकाण दक्षिण मुंबईपासून केवळ ६ तासांच्या अंतरावर आहे. त्यामुळे मुंबईकरांसाठी शक्तीपीठ महामार्ग वर पोहोचणं सोपं होणार आहे. शक्तीपीठ महामार्ग बांदा येथे समाप्त होतो. मुंबई-बंगळुरू महामार्गाला जोडणाऱ्या जागेपासून महामार्गेचे शेवटचे टोक केवळ १७३ किलोमीटर अंतरावर असेल. हे अंतर पार करण्यासाठी २ तासांपेक्षाही कमी वेळ लागण्याची शक्यता आहे.

**दक्षिण मुंबई ते गोवा प्रवास**

सध्या दक्षिण मुंबईहून गोव्यापर्यंत प्रवास करण्यासाठी ट्रेनने ११ तास तर गाडीने ११-१२ तास लागतात. हाच वेळ ८ तासांहूनही कमी होणार आहे. याशिवाय, भविष्याच पुणे-बंगळुरू महामार्गाचं काम पूर्ण होताच हा वेळ आणखी कमी होण्याची शक्यता आहे. याशिवाय पुणे-सोलापूर महामार्गालाही शक्तीपीठ महामार्ग जोडणार आहे. सोलापूर जिल्ह्यापासून ६० किलोमीटर अंतरावर मोडनिंबजवळ हे दोन्ही मार्गे एकमेकांशी जोडलेले असतील. यामुळे सोलापूर आणि तुळजापूरपर्यंत कनेक्टीव्हीटी वाढणार आहे.

## पंढरपूर तालुका पोलिसांची अवैध वाळूविरुद्ध मोठी कारवाई

### ४७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त!

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.२२, पंढरपूर (सोलापूर) :** पंढरपूर तालुका पोलिसांनी अवैध वाळू माफियाविरुद्ध मोठी कारवाई केलेली असून सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत बगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी शेगाव दुमला गावात एक टेम्पो गाडी एक ट्रॅक्टर व वाळू उपसा करण्यासाठी लागणारी यारी एकूण किंमत ११ लाख ५० हजार तसेच आंबे गावातून १२५ ब्रास वाळूचा साठा किंमत रुपये सात लाख ५० हजार त्याचप्रमाणे मौजे आंबे गावात एक टिप्पर किंमत २८ लाख रुपये त्यामध्ये पाच ब्रास वाळू किंमत ३०००० असा एकूण ४७ लाख रुपयाचा मुद्देमाल त्यामध्ये एक टिप्पर एक एंट्रा टेम्पो एक ट्रॅक्टर व एकूण १३० ब्रास वाळू असा एकूण किंमत रुपये ४७ लाख रुपयांचा वाहने व वाळूसाठा पंढरपूर तालुका पोलिस आणि जप्त करून मोठी कारवाई केली आहे.

पंढरपूर तालुका पोलिसांनी टेम्पो ट्रॅक्टर टिप्पर याचे चालक आणि मालक व वाळू साठा करणारे यांचे आरोपीविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करायची कारवाई चालू आहे सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी, अक्षय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, विक्रम वडणेअडख आबा शेंडगे, पोलीस हवालदार सुहास देशमुख, दीपक मंगेश रोकडे, अभिमन्यू गरड, भोसले, सचिन गावडे, सागर गवळी, पोलीस चालक रामभाऊ चाटे हसन नदाफ व गोडसे यांच्या पथकाने केली.

## तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या महिलांवर वाघाचा हल्ला; चार महिला ठार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही परिसरात आज सकाळी घडलेल्या भीषण घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. जंगलात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या चार महिलांवर वाघाने अचानक हल्ला करून त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

मृतांमध्ये कवडूबाई दादाजी मोहुर्ले (४५), अनुबाई दादाजी मोहुर्ले (४६), संगीता संतोष चौधरी (३६) आणि सुनीता कौशिक मोहुर्ले (३३) यांचा समावेश आहे. या सर्व महिला गुंजेवाही व परिसरातील रहिवासी असून रोजच्या प्रमाणे तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेल्या होत्या.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सकाळच्या सुमारास या महिला जंगलात कामात व्यस्त असताना दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर झडप घातली. हल्ला इतका वेगवान आणि तीव्र होता की महिलांना बचावाची कोणतीही संधी मिळाली नाही. या भीषण हल्ल्यात चारही महिलांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वनविभाग व पोलीस प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह पुढील तपासासाठी हलविण्यात आले असून परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. संबंधित वाघाचा माग काढण्यासाठी वनविभागाने विशेष पथक तैनात केले आहे.



या घटनेमुळे गुंजेवाहीसह आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तेंदूपत्ता हंगाम सुरू असल्याने मोठ्या प्रमाणावर मजूर जंगलात जात असतात. त्यामुळे नागरिकांनी सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत वनविभागाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले असून गरज नसल्यास जंगलात जाणे टाळावे, असेही सांगितले आहे. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना शासनाकडून मदत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

या घटनेमुळे मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## २४ तासांत खून उघड; पत्नीसह दोन आरोपींना जेरबंद

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.२२, तलासरी (पालघर) :** तलासरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या खून प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावत पालघर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या वेगवान आणि अचूक कारवाईमुळे पालघर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

दि. २० मे २०२६ रोजी तलासरी पोलीस ठाण्यात फिर्यादी राजन कलामभाई माच्छि(वय ५६, रा. पलसाड अगरामोर कलेगा, ता. उमरगाव, जि. वलसाड, गुजरात) यांनी त्यांचा मुलगा जयदीपभाई राजन माछी (वय ३३) याच्या खुनाबाबत तक्रार दाखल केली होती. फिर्यादीच्या तक्रारीवरून तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व तलासरी पोलीस ठाण्याचे विशेष तपास पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती व विविध अंगांनी तपास करत आरोपींपर्यंत धागेदोरे पोहोचवले.

तपासात मयत जयदीप माछी याची पत्नी जेरी माच्छि (वय ३२) हिचे अन्य व्यक्तीसोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती समोर आली. या संबंधातूनच पतीचा काटा काढण्याचा कट रचण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी जेरी माच्छि व तिच्या साथीदाराला ताब्यात घेत अटक केली.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अजय गोरड यांच्या नेतृत्वाखाली सुरू असून, आरोपींकडून अधिक चौकशी करण्यात येत आहे.

या कारवाईत पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कापरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व तलासरी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## देशातील पहिले अंडरवॉटर म्युझियम सिंधुदुर्गात साकारणार!

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, मुंबई :** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) मार्फत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक परिसरात भारतीय नौदलाची सेवानिवृत्त युद्धनौका 'एक्स-आयएनएस गुलदार' समुद्रतळावर यशस्वीरित्या स्थापित करण्यात आली आहे. देशातील अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि वैशिष्ट्यपूर्ण पाणबुडी पर्यटन प्रकल्प साकार होत आहे. मे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्या समन्वयाने राबविण्यात येणारा हा प्रकल्प भारतीय पर्यटन क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले असून हा प्रकल्प जागतिक स्तरावर सागरी पर्यटन आकर्षण म्हणून उदयास येणार आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली आहे.

एक्स-आयएनएस गुलदार ही भारतीय नौदलातील 'मगर' वर्गातील लँडिंग शिप टँक प्रकारातील युद्धनौका असून तिने तब्बल ३९ वर्षे राष्ट्रसेवा बजावून १२ जानेवारी २०२४ रोजी भारतीय नौदलामधून निवृत्त झाली. पोलंडमधील ग्डिनिया शिपयार्ड येथे ३० डिसेंबर १९८५ रोजी नौकेचे उद्घाटन झाले होते. ८३.९ मीटर लांबीची ही नौका उभयचर युद्ध कारवाई, सैनिक व रसद वाहतूक, किनारी सुरक्षा तसेच विविध नौदल सराव मोहिमांमध्ये कार्यरत होती.

माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड मुंबई यांच्या माध्यमातून १९ मे २०२६ रोजी सिंधुदुर्ग किनाऱ्यावरील निवती रॉक परिसरात सुमारे २२ मीटर खोलीवर नौका समुद्रतळावर स्थापित करण्यात आले. या स्थळाची निवड महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि राष्ट्रीय सागर विज्ञान संस्था यांच्या सविस्तर वैज्ञानिक अभ्यासानंतर करण्यात आली असून परिसरात नैसर्गिक प्रवाळभित्ती नसल्याचे तसेच विपरित पर्यावरणीय परिणाम नसल्याचे प्रमाणीत झाले आहे, असेही मंत्री देसाई असे म्हणाले.



स्कटलिंगपूर्वी नौकेची पर्यावरणीय स्वच्छता करण्यात आलेली असून एक्स-आयएनएस गुलदारची मजबूत पोलादी रचना आता कृत्रिम प्रवाळभिंत्ती म्हणून कार्य करणार असून त्यामुळे समुद्री जैवविविधता, प्रवाळ वाढ, मासेमारी संसाधने आणि पर्यावरणीय संतुलनास चालना मिळणार आहे. या प्रकलामध्ये जेट्टीवरुन स्पीडबोट द्वारे निवती रॉक येथे पोहोचणे व तेथील बार्जवर उतरुन पाणबुडी किंवा स्कूबा व्दारे जहाजामधील प्रवाळ, मत्स्य पाहणी करणे अपेक्षित आहे.

दरम्यान या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यासह संपूर्ण कोकण किनारपट्टीतील पर्यटन अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. देश-विदेशातील पर्यटकांच्या वाढत्या आगमनामुळे स्थानिक व्यवसाय, निवास व्यवस्था, वाहतूक, खाद्यव्यवसाय आणि पर्यटन सेवांमध्ये आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होणार आहे. दीर्घकालीन दृष्टीकोनातून हा प्रकल्प स्थानिक आर्थिक विकासासाठी व स्थानिक रोजगारासाठी, पूरक व्यवसायासाठी महत्त्वपूर्ण केंद्र ठरणार आहे.

एक्स-आयएनएस गुलदार प्रकल्पामुळे महाराष्ट्रात प्रथमच जागतिक दर्जाचा पाणबुडी पर्यटन अनुभव विकसित होत आहे. साहसी पर्यटन, स्कुबा डायव्हिंग, अंडरवॉटर एक्सप्लोरेशन आणि सागरी पर्यटन क्षेत्राला नवे परिमाण प्राप्त होणार असून महाराष्ट्राची ओळख देशातील अग्रगण्य साहसी पर्यटन स्थळ म्हणून निर्माण होण्यास मदत होणार आहे. समुद्रतळावर स्थापित करण्यात आलेली युद्धनौका कालांतराने कृत्रिम प्रवाळभित्ती म्हणून विकसित होणार असून त्यामुळे सागरी जैवविविधतेला पोषक वातावरण निर्माण होईल. विविध प्रकारचे मासे, सागरी वनस्पती आणि सूक्ष्म जीवांसाठी हे संरक्षित अधिवास ठरणार आहे.

भारतीय नौदलाच्या सेवेत कार्यरत राहिलेल्या युद्धनौकेचा पर्यावरणपूरक व पर्यटनाभिमुख पद्धतीने पुनर्वापर करण्यात येत असून हा उपक्रम राष्ट्रसेवेतील ऐतिहासिक वारशाला अभिवादन करणारा आहे. या माध्यमातून नौदलाचा गौरवशाली इतिहास आणि सागरी वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यात मदत होणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राला नाविन्यपूर्ण आणि शाश्वत पर्यटन प्रकल्प राबविणाऱ्या अग्रगण्य राज्यांमध्ये स्थान मिळवून देणार आहे. तसेच भारताच्या सागरी पर्यटन क्षमतेची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी ओळख निर्माण करण्यास मदत होणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र व भारताची शाश्वत व नाविन्यपूर्ण पर्यटन क्षेत्रातील जागतिक ओळख अधिक मजबूत करणार आहे.

फ्लोरिडा (अमेरिका) येथील युएसएस ऑरिस्कनी आणि ऑस्ट्रेलियातील एचएमएएस स्वॅन यांसारख्या जागतिक दर्जाच्या ब्रेक डायव्हिंग स्थळांपासून प्रेरणा घेत विकसित करण्यात आलेला आहे. हा प्रकल्प भारतातील पहिला जागतिक स्तरावरील अंडरवॉटर म्युझियम आणि कृत्रिम प्रवाळभित्ती पर्यटन उपक्रम ठरणार आहे. MTDC तर्फे देश-विदेशातील पर्यटक, स्कुबा डायव्हर्स, सागरी अभ्यासक, विद्यार्थी, छायाचित्रकार व संशोधकांना या अद्वितीय अंडरवॉटर पर्यटन अनुभवासाठी निमंत्रित करण्यात येत आहे, अशी बाब महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी स्पष्ट केली.

## बोरखिंडमध्ये बिबट्याचा थरार; हिमतीने वाचला जीव

**दि.२२, सिन्नर :** सकाळची वेळ... घराजवळ शांतपणे जनावरांचा चारा कापण्याचे काम सुरू होते. अचानक दबक्या पावलांनी आलेल्या बिबट्याने पांडुरंग निरगुडे यांच्या मानगुटीवर झडप घातली आणि काही क्षणांतच सोनार खोरा परिसरात एकच खळबळ उडाली. जीव वाचवण्यासाठी निरगुडे यांनी उजव्या हाताने प्रतिकार केला आणि बिबट्याला परतवून लावले. मात्र, थरार इथेच थांबला नाही. पहिल्या हल्ल्यानंतर जांभळाच्या ५० ते ६० फूट उंच झाडावर जाऊन बसलेल्या बिबट्याने तासाभराने पुन्हा खाली उतरून दुसऱ्या तरुणावर झडप घातली. पांडुरंग लक्ष्मण निरगुडे (४०) हे सकाळी सातच्या सुमारास घराजवळील शेतात बसून जनावरांसाठी चारा कापत होते. त्याचवेळी अचानक बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. क्षणाचाही विलंब न करता निरगुडे यांनी उजव्या हाताने बिबट्याला प्रतिकार केला. झटापटीत त्यांच्या हाताला गंभीर जखम झाली; मात्र त्यांनी प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला.

घटनेनंतर वन विभागाला माहिती देण्यात आली. वन विभागाचे कर्मचारी रामदास हरळे यांनी जखमी निरगुडे यांना तातडीने नाशिकरोड येथील बिटको रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, हल्ल्यानंतर बिबट्या जवळील जांभळाच्या झाडावर जाऊन बसला होता. परिसरात भीतीचे वातावरण असतानाच निरगुडे यांचे भाचेजावई सुभाष कचरू फोडसे (वय २६) हे त्यांच्या घरी आले. अंगणात पोहोचताच झाडावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक खाली उतरून त्यांच्यावरही झडप घातली. पाठीमागून पंजा मारल्याने फोडसे यांचा शर्ट फाटला. हल्ल्याने काही क्षण तेही गांगरले; मात्र त्यांनी धाडस दाखवत उजव्या हाताने बिबट्याला प्रतिकार केला. त्यानंतर बिबट्या जंगलाच्या दिशेने पसार झाला.

## संपादकीय

### कासव दिन



२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उद्देश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

**– श्याम ठाणेदार**

# बाजारू 'शिक्षण' व्यवस्था !




शिक्षण क्षेत्र हे पवित्र विद्यादानाचे क्षेत्र राहिलेले नाही तर तो केवळ पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे हे आजवर वारंवार अधोरेखित होत आले आहे. 'एनटीए' ने 'मेडिकल प्रवेश परिक्षेचा घातलेला' नीट 'गोंधळ गाजतो आहे जवळपास बावीस लाख परिक्षार्थिंचा जीव टांगणीला लागला आहे, मोठ्या मेहनतीने अभ्यास करुन परीक्षा दिल्यानंतर पुन्हा परिक्षा द्यावी लागणार आहे, या धक्क्याने काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे.

त्यातच त्रिभाषा सक्तीचा विषयाचा वाद निर्माण झाला, तो गोंधळ उडाला असतांनाच सीबीएसई बोर्डाचा निकाल लागला आणि नवीनच ओएसएम पद्धतीने गुणांचे फेर मुल्यांकन केले जाणार त्याचा गोंधळ सुरू झाला. जवळपास त्रेसष्ठ लाख विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांचा जीव टांगणीला लागला आहे. दरवर्षी कुठल्या ना कुठल्या परिक्षांचा गोंधळ होणे हे नित्याचेच झाले आहे, पेपरफुटी च्या घटना सातत्याने घडत आहेत, मात्र ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती. शिक्षण क्षेत्र हे जणु काही विद्यार्थी, ऊद्याचे समाज घडवणारे शेत्र नाही तर चराऊ कुरणच बनवले गेले आहे आणि जो तो मिळेल तशी संधी साधून पैसा कमावण्याच्या प्रयत्नात आहे आणि आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशीच परिस्थिती जिकडेतिकडे दिसते आहे. कधी काळी शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून अनेक समाजसुधारकांनी आपले तन मन धन अर्पण करून शिक्षण संस्था काढल्या, शाळा काढल्या मात्र शिक्षणाचे बाजारीकरण झाल्याने शिक्षण सम्राटांची जागा बाजारु शिक्षण महर्षींनी घेतली, आजची शिक्षण व्यवस्था हे त्याचा बाजारु चेहरा हे आजच्या शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव आहे.

शिक्षणाने ऊद्याचे समाज घडतो, देश घडतो, देशाच्या वाटचालीसाठी शिक्षण तितकेच महत्त्वाचे आहे आणि प्रत्येकाला शिक्षण मिळणे हा मुलभूत अधिकार आहे, शिक्षण ऊपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासन व्यवस्थेची आहे मात्र गेल्या काही वर्षांपासून सरकार ही जबाबदारी टाळत आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण मोठ्याप्रमाणावर होत आहे आणि शिक्षण शेत्रात पैसा मिळतो हे लक्षात आल्याने शिक्षणाचा बाजार मांडला गेला आहे. ऐकिकडे सरकारी शाळांच दुरावस्था, सातत्याने सरकारी शाळा बंद पडत असताना खाजगी शाळा, खाजगी क्लासेस यांचे पेव फुटले आहे आणि शिक्षण हा केवळ पैशाचा खेळ बनला आहे. याची परिणती म्हणजे शिक्षण क्षेत्रात प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचार बोकाळला आहे त्यातुन मग कधी पेपरफुटी, कॉपी, मार्क वाढवुन पास करणे, अशा गोष्टी घडत आहेत. नीट परिक्षेचा गोंधळ सुरू असतांनाच, नीट परिक्षेतील गोंधळामुळे काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे. अगोदरच गळेकापू स्पर्धा त्यात कधी पेपरफुटी, कधी कॉपी यामुळे परीक्षांचा बट्ट्याबोळ झाला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी आता नवनवीन खुलासे होऊ लागले आहे आणि खाजगी क्लासेस मधे पैसा कमावण्याचा धंदा कसा होतो हे आता समाजासमोर येऊ लागले आहे शिक्षण क्षेत्र हे पवित्र विद्यादानाचे क्षेत्र राहिल नाही तर तो एक पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे मात्र यामुळे ऐकुणच शिक्षण व्यवस्थेची लक्तरे वारंवार वेशीवर टांगली जात आहे.

पुर्वीच्या काळी एखाद्या ढ विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त क्लास लावला जायचा मात्र आता अगदी केजी पासुन पीजी पर्यंत शिक्षणासाठी खाजगी क्लास लावला जातो त्यामुळे जिकडेतिकडे खाजगी क्लासेस चे पेव फुटले आणि खाजगी क्लास देखील पैसा कमावण्याचा धंदा झाला. यामुळे स्पर्धा वाढली आणि आपल्याच क्लासचे जास्तीत जास्त विद्यार्थी कसे अधिक गुणांनी उत्तीर्ण होतात हे दाखवुन देण्याची स्पर्धा लागली त्यातुन लातुर, कोटा पॅटर्न ची चर्चा होऊ लागली मात्र या पॅटर्नचा खरा चेहरा आता ऊघड होऊ लागला आहे. खाजगी शिकवणी, क्लासेसमधे मोठे अर्थ कारण चालते यामुळेच पेपरफुटी, कॉपी सारखे प्रकार वाढले. या सगळ्यांत शिक्षणाचा दर्जा तर घसरला त्याच बरोबर गुणवत्ता देखील खालावली आहे.

शिक्षण क्षेत्रात राजकारण आणि सत्ताकारण देखील शिरले आहे त्यामुळे महत्त्वाच्या पदावर एका विशिष्ट विचारसरणीचे लोक बसवले जातात हे काही लपुन राहिलेले नाही. आजवर अनेक घटना घडल्या मात्र ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती राहिली आहे त्यामुळे असे प्रकार सातत्याने, बिनदिक्कतपणे सुरुच आहे. देशाचे ऊद्याचे भविष्य असलेल्या तरुणाई ला कसे घडवले जाणार याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. ऊद्याचा भारत असाच भ्रष्टाचारी व्यवस्थेतुन घडणार का?

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# गोवंश जगला पाहिजे !

गोवंशाचे जतन, संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी तसेच गोतस्करी, गोवंशाची अवैध वाहतूक आणि बेकायदेशीर कत्तलखान्यांवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने नवीन मार्गदर्शक सूचना जरी केल्या असून सर्व नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांना त्यांच्या क्षेत्रातील अवैध कत्तलखाने शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संघटीतपणाने वारंवार गोतस्करी करणाऱ्या टोळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे पोलिसांना देण्यात आले असून परिवहन विभागालाही गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी वाहनांची नियमित तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर हे आदेश देण्यात आले असले तरी याची अमलबजावणी कितपत होईल हे मात्र देवच जाणे. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू करून ११ वर्षे उलटली. २०२४ मध्ये राज्य सरकारने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला. तरीही राज्यातील गोवंश हत्या कमी झालेल्या नाहीत. बकरी ईदच्या निमित्ताने राज्यात मोठ्या प्रमाणात गोवंश कापला जातो हे सत्य कुणीही नाकारू शकत नाही.

गोवंशाने भरलेलया गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन कोणत्या ना कोणत्या वृत्तपत्रात वाचायला मिळतात. ज्या पद्धतीने या गाड्यांमध्ये गोवंश भरलेले असतात ते पाहिल्यावर कोणत्याही हिंदूंच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. गाड्यांमध्ये अत्यंत निर्दयपणे कोंबून भरलेल्या गोवंशांपैकी काही गोवंश तर प्रवासातच मृत पावतात. हे सर्व पाहिल्यावर राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही ? हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय. गोहत्या बंदी कायदा राष्ट्रीय स्तरावर करण्याची आणि गाईला राष्ट्रीय पशू म्हणून घोषित करण्याची मागणी वारंवार केली जात आहे. भारतात बहुसंख्य असलेल्या हिंदूंना गाय ही अत्यंत पूजनीय आहे. कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते.

गायीच्या दुधाचे महत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर



संशोधन करू गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे महत्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे, दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. पंजाब केसरी महाराजा रणजीत सिंह यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यात गोहत्या करणाऱ्याला मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रावधान केले होते. रामचंद्र बीर यांनी गोहत्या थांबवण्यासाठी ७० दिवस उपवास केला होता. हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि अध्यात्मिक संप्रदाय यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यानंतर राज्यात गोवंश हत्याबंदी विधयेक आणण्यात आले; मात्र आजमितीला त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीची ढिलाई दिसून येत आहे.

भारत हा पूर्वीपासून कृषिप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत घट होऊ लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात प्रचंड उकाडा वाढला आहे. उन्हाळ्यात राज्याच्या अनेक भागांत दुष्काळी परिस्थितीमुळे फार मोठे संकट ओढवते . शेतकऱ्यांचा आणि त्याच्या कुटुंबीयांचा रोजच्या अन्न पाण्याचा प्रश्न निर्माण होतो तिथे घरच्या गोधनाला चारा कुठून देणार ? पुरेसा चारा मिळत नसल्याने गाई दूध देत नाहीत. मायेने पाळलेल्या गोधनाचे आपल्या डोळ्यासमोर हाल नको म्हणून अनेक गरीब शेतकरी आपले घरचे गोधन कसायांना विकतात. गोरक्षक आणि पोलीस माहिती मिळताच जीवावर उदार होऊन गोवंश घेऊन जाणाऱ्या गाड्या पकडतात आणि सुटका केलेल्या गोवंशांना जवळच्या गोशाळांत सोडतात. ग्रामीण भागातील गोशाळांमध्ये अशा प्रकारे सोडलेल्या गाईंमध्ये अनेक गाई या भाकड असतात. त्यामुळे गोशाळांना दूध अथवा दुग्धजन्य उत्पादनातून तितकेसे उत्पन्नही मिळत नाही. तरीही गोपालक गोशाळांमध्ये त्यांची प्रेमाने जपणूक करतात. त्यांच्या औषध पाण्यावर हजारो रुपये खर्च करतात. उन्हाळ्यात दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळेतील शेकडो गोवंशाच्या रोजच्या चारापाण्याचा खर्च भागवणे गोशाळा चालवणाऱ्यांनाही अवघड जाते. सरकारी अनुदान प्राप्त गोशाळांपेक्षा विनाअनुदानित गोशाळांची संख्या अधिक असल्याने अशा गोशाळा चालवण्यासाठी सर्वस्वी समाजातील देणगीदारांवर अवलंबून राहावे लागते. गोशाळांतील वाढते गोधन आणि मिळणाऱ्या मर्यादित देणग्या यांमुळे गोशाळा चालवणाऱ्या अनेक गोपालकांवर दरवर्षी आर्थिक संकट ओढवते. कसायांकडून अशा गोशाळांना संपर्क करून गोवंशाची मागणी केली जाते; मात्र आज काही असेही गोपालक आहेत ज्यांनी गोशाळा चालवण्यासाठी स्वतःचे घरदार विकले आहे; मात्र एकही गोवंश कसायापर्यंत जाऊ दिलेला नाही. गोशाळेतील गोवंश जगवायचे असतील, तर केवळ सरकारवर अवलंबून राहणे चालणार नाही. त्यासाठी समाजातील सधन मंडळींनी पुढे यायला हवे. आपल्या ऐपतीनुसार गोवंशाच्या काही दिवसांचा खर्च भागेल असे अर्पण द्यायला हवे. कसायाच्या तावडीतून केवळ गोधन वाचवून चालणार नाही तर ते वाचवलेले गोधन जगवायची जबाबदारीही आपलीच आहे हे जाणून गोशाळांना शक्य तितके अर्थसाहाय्य प्रत्येकाने करायला हवे !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## निनो संकट

अल निनोचे संकट
रे तयार नव्यादमाने
पाऊस अपेक्षा यंदा
पडे उतरत्या क्रमाने

वर्षावर्षाव भिजवेलं
घ्यायचे शांती दमाने
स्वागत अमृतधारेचे
करतो अतीव प्रेमाने

गत वर्षीचा महा पूर
ओसंडले सर्व रकाने
वाईटबातम्या ऐकता
बधीर झाली रा काने

संकटा लढण्यासाठी
तत्पर कधीचीचं मने
रुप भले घेऊद्या नवे
छळ वादी चित्त जुने

भरवसा उडून जाता
भाजती कोवळीउन्हे
निसर्ग क्रौर्य विक्षिप्त
खुडलेली स्वप्ने तान्हे

कधीचं नसे सुरक्षित
पावसा तव आवर्तने
दरवर्षी भिन्न कारणे
बिघडत जाती वर्तने

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## बोरी येथे महामार्गावर वाहने उभी केल्याने वाहतुकीस अडथळा



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२२, बोरी (परभणी) :** बोरी येथे महामार्गालगत रस्त्यावर वाहने उभी केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. रस्त्याच्या कडेला अव्यवस्थितपणे वाहने उभी राहत असल्याने इतर वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच अपघाताचा धोकाही वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असून वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## गुडसूर येथे पेरणीसाठी बियाणे अर्ज ऑनलाईन करून देण्यात आले



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२२, उदगीर (लातूर) :** शुक्रवार, दिनांक २२ मे २०२६ रोजी उदगीर गुडसुर येथे सोयाबीन बियाणे, ट्रॅक्टर, बीबीएफ पेरणी यंत्र तसेच वैयक्तिक शेततळेसाठी शेतकऱ्यांचे अर्ज ऑनलाईन करून देण्यात आले. यामध्ये सुमारे २५ शेतकऱ्यांनी अर्ज ऑनलाईन करून घेतले. तसेच इतर शेतकऱ्यांना अर्ज ऑनलाईन करण्याबाबत असतील तर कृषी सहायक केंद्र यांच्याकडे संपर्क साधावा. या सर्वांना कृषी सहायक अधिकारी, गुडसूर श्री.केंद्रे डी.एस यांनी मार्गदर्शन केले.

## शेतकऱ्याच्या मुलाची झेप थेट देशातील नामांकित विद्यापीठात

### तब्बल १५.६५ लाखांची शिष्यवृत्ती मिळवत वैभव ठोंबरेची यशोगाथा



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२२, जिंतूर (परभणी) :** ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहिली तर ती जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर नक्कीच पूर्ण होऊ शकतात. याचे प्रेरणादायी उदाहरण निवळी येथील वैभव वैजेनाथ ठोंबरे याने घालून दिले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या या शेतकरी पुत्राने एकाच वेळी देशातील दोन नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवत मोठे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे त्याला तब्बल १५ लाख ६५ हजार रुपयांची शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे वैभव ठोंबरे याची देशातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या Indian Institute for Human Settlements येथे एम.एस्सी. सस्टेनेबिलिटी सायन्स अँड प्रॅक्टिस या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून त्याला १५.६५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे.

ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यासाठी हे यश अत्यंत उल्लेखनीय मानले जात आहे. याचबरोबर वैभवची Azim Premji University येथे एम.ए.इन डेव्हलपमेंट या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी देखील निवड झाली आहे. सामाजिक विकास, ग्रामीण परिवर्तन आणि शाश्वत विकास या विषयांमध्ये वैभवला विशेष रुची असून त्याने सातत्यपूर्ण अभ्यास आणि सामाजिक भान जपत हे यश मिळवले आहे. तसेच Shiv Nadar Institution of Eminence येथे एम.ए. इन रुरल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाच्या मुलाखतीसाठीही त्याची निवड झाली आहे. त्यामुळे वैभवच्या शैक्षणिक प्रवासाला आणखी नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.घरची परिस्थिती अत्यंत कठीण असतानाही वैभवने कधीही हार मानली नाही. शेतकरी कुटुंबातील मुलगा म्हणून अनेक आर्थिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जात त्याने शिक्षणाची वाट अखंड सुरू ठेवली.

या यशाचे श्रेय त्याने आपल्या आई-वडिलांसह Eklavya India Foundation, Path Education Foundation तसेच कठीण काळात साथ देणाऱ्या मित्रपरिवाराला दिले आहे. अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न सुरू ठेवले, त्यामुळेच आज हे यश मिळाले, अशी भावना वैभवने व्यक्त केली. भविष्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छाही त्याने व्यक्त केली आहे. वैभव ठोंबरे यांच्या या यशामुळे निवळी गावासह संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून ग्रामीण भागातील युवकांसाठी त्याची यशोगाथा प्रेरणादायी ठरत आहे.

## पोस्ट-कुरिअरचा गोंधळ मिटवणारा ४००६११ दिव्याला बहाल

### विजय भोईर यांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** 'जागा हो दिवेकर' या संस्थेच्या माध्यमातून विजय भोईर करत असलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले असून दिव्याला स्वतंत्र पिनकोड देण्यात आला आहे.

दिवा आणि मुंब्रा यांना संयुक्त पिनकोड असल्याने नागरिकांना पोस्ट, कुरिअर, बँकिंग व इतर शासकीय कामांमध्ये अनेक अडचणी येत होत्या. ही गैरसोय दूर व्हावी यासाठी विजय भोईर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जनरल पोस्ट ऑफिस, मुंबई येथे अधिकाऱ्यांना भेटून मागणी केली होती.

याबाबत त्यांनी वेळोवेळी ठाण्याचे आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे यांच्यामार्फत पक्षाच्या निदर्शनास आणून दिले होते. विजय भोईर यांनी स्वतः दिल्लीला पत्रव्यवहार केला होता. तत्कालीन खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांनी ही दिल्लीला प्रत्यक्ष भेटून पत्र दिले होते

.अखेर दिव्यासाठी स्वतंत्र ४००६११ हा पिनकोड जाहीर होऊन त्याच्या अंम लबजावणीसाठी पुढील कार्यवाही सुरू झाली आहे. अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याने सर्व नागरिकांकडून तसेच दिव्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींकडून विजय भोईर यांचे अभिनंदन होत आहे.

# गावदेवी भाजी मार्केट आगीत २ जवान शहीद

## कुटुंबीयांना १० लाख, नोकरी देणार; ७-१०दिवसांत मार्केट पूर्ववत करणार – महापालिकेचा निर्णय




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, ठाणे :** दिनांक २१ मे २०२६ रोजी ठाणे येथील गावदेवी भाजी मार्केट येथे लागलेल्या भीषण आगीत आपले दोन कर्तव्यदक्ष अग्निशमन जवान शहीद झाले.

ही घटना अत्यंत दुर्दैवी व मन हेलावून टाकणारी आहे. दिवंगत जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महापालिकेने त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

या पार्श्वभूमीवर ठाणे म हानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक पार पडली. यावेळी ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार नरेश म्हस्के, महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपम हापौर कृष्णा पाटील व सर्व नगरसेवक उपस्थित होते.

**बैठकीतील प्रमुख निर्णय :-**

१. शहीद जवानांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ₹१० लाखांची आर्थिक मदत.

२. जखमींना प्रत्येकी ₹१ लाखांची मदत.

३. दिवंगत जवानांच्या कुटुंबातील एका सदस्याला महापालिकेच्या सेवेत सामावून घेणार.

४. गावदेवी मार्केट परिसराचे तातडीने स्ट्रक्चरल व फायर ऑडिट करणार.

५. पुढील ७ ते १० दिवसांत सर्व सुविधा देऊन मार्केटची व्यवस्था पूर्ववत करणार.

तसेच भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शहरातील सर्व गर्दीची ठिकाणे, मार्केट, हॉस्पिटल्स यांचे पुन्हा फायर ऑडिट करून आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन कटिबद्ध असून या संकटसमयी सर्वांनी एकजुटीने उभे राहावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## शेतकऱ्यांच्या हितासाठी आ.मुनगंटीवार यांनी सातत्याने केलेल्या संघर्षाला यश; 'लिंकिंग' पद्धतीवर बंदी

### खतांसोबत इतर उत्पादने विक्रीवर बंदी; नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायम आक्रमक आणि अभ्यासपूर्ण भूमिका घेत त्यांच्या हितासाठी सातत्याने संघर्ष करणारे राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना अखेर मोठे यश मिळाले आहे. खते, बियाणे आणि कृषी निविष्ठांच्या खरेदीवेळी शेतकऱ्यांना जबरदस्तीने इतर उत्पादने खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या बेकायदेशीर लिंकिंग पद्धतीविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठविला होता.

या अन्यायकारक प्रकारामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असल्याची बाब त्यांनी अधिवेशनापासून प्रशासनापर्यंत ठामपणे मांडली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत राज्य शासनाने अखेर अनुदानित खतांसोबत इतर विनाअनुदानित उत्पादने सक्तीने विक्री करण्याच्या प्रकारावर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

राज्यात शेतकऱ्यांवर खते, बियाणे आणि कृषी निविष्ठांच्या खरेदीवेळी अन्य उत्पादने घेण्यासाठी दबाव आणण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू होते. या बेकायदेशीर लिंकिंग पद्धतीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याची बाब आ.सुधीर म ुनगंटीवार यांनी वारंवार अधोरेखित केली होती. शेतकऱ्यांसाठी ही पद्धत चुकीची असून ती तातडीने बंद करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी विधिमंडळ अधिवेशनात ही केली होती.यासोबतच चंद्रपूर जिल्ह्यात काही कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर बेकायदेशीररीत्या लिंकिंगची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर आ.सुधीर मुनगंटीवार यांनी हा विषय अत्यंत गांभीर्याने घेत कठोर भूमिका घेतली होती. शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाविरोधात थेट मैदानात उतरून त्यांनी बल्लारपूर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन कोरोमंडल कंपनीविरोधात तक्रार दाखल केली होती. संबंधित कंपनीकडून शेतकऱ्यांना बेकायदेशीररीत्या लिंकिंगसाठी भाग पाडले जात असल्याचा आरोप करत करण्यात आलेल्या या तक्रारीनंतर अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्रालयात कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठकही पार पडली होती. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांवर लिंकिंगच्या माध्यम ातून लादली जात असलेली सक्ती आणि त्यातून होत असलेले आर्थिक शोषण याची गंभीरता मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती. शेतकऱ्यांना गरजेपेक्षा अधिक आणि अनावश्यक उत्पादने खरेदी करण्यास भाग पाडणे ही अन्यायकारक बाब असून अशा प्रकारांना तात्काळ आळा घालण्याची गरज त्यांनी ठामपणे मांडली होती. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने या विषयावर तातडीने कठोर निर्णय घेण्याची मागणी ही आमदार मुनगंटीवार यांनी केली होती.

आ.सुधीर मुनगंटीवार यांनी या विषयाची गंभीरता ओळखत सुरुवातीपासूनच सातत्याने पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांना खते व कृषी निविष्ठांच्या खरेदीवेळी अन्य उत्पादनांची सक्ती करून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याची बाब त्यांनी वारंवार राज्य शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने ही बेकायदेशीर लिंकिंग पद्धत तात्काळ बंद करण्यात यावी, अशी त्यांनी ठाम म ागणी केली होती. शेतकऱ्यांवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक शोषणाला आळा घालण्यासाठी त्यांनी सातत्याने सरकारकडे ही बाजू लावून धरली होती. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि आग्रही पाठपुराव्याम ुळेच शासनाला अखेर या शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाची दखल घ्यावी लागली आणि शेतकऱ्यांना दिलासा देणारा हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या कृषि यंत्रास मिळाले पेटंट



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२२, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ, दि.२२ मे २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प कार्यरत आहे.

या प्रकल्पामध्ये संशोधित केलेल्या ट्रॅक्टरचलीत स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित या यंत्रास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने पेटंट प्रदान केले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली या यंत्राच्या संशोधनात महत्वाचे योगदान देणारे अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ.तुलसीदास बास्टेवाड तसेच त्यांचे सहकारी डॉ. संजय भांगरे, डॉ. रवीकिरण राठोड, इंजि. रोहित गेठे यांचा यामध्ये सहभाग आहे.

सदर यंत्र ५५ अश्वशक्ति आणि त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने सहज चालते, स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित एकत्रित मशागतीने पेरणी योग्य जमीन तयार करण्यासाठी उपयुक्त आहे. या यंत्राच्या वापरामुळे मशागतीसाठी लागणाऱ्या खर्चात आणि वेळेत बचत होते. एका तासांमध्ये ०.३३ हेक्टर क्षेत्रावर मशागत करता येते.

या यंत्राच्या वापरामुळे पारंपारिक पद्धतीपेक्षा खर्चामध्ये ४४% पर्यंत बचत होते. एकत्रित मशागत करण्यासाठी विकसीत करण्यात आलेल्या या ट्रॅक्टरचलीत फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित या यंत्रास राज्यस्तरीय संयुक्त कृषि संशोधन व विकास समि ती बैठक-२०२५ मध्ये प्रसारीत करुन शिफारशीत करण्यात आलेले आहे. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (कृषि अभियात्रिकी) डॉ.एस.एन.झा, सहाय्यक महासंचालक डॉ. के.पी. सिंग, भोपाळ येथील केंद्रिय कृषि अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ.सी.आर. मेहता, अखिल भारतीय समन्वीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प संचालक डॉ.पी.एन. अग्रवाल व डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.सचिन नलावडे यांनी या पेटंटमध्ये सहभागी शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे. कृषि विद्यापीठाच्या सर्व स्तरातुन संबंधीत शास्त्रज्ञांचे अभिनंदन होत आहे.

## गुंजेवाहीतील दुर्दैवी घटनेची आ.मुनगंटीवार यांच्याकडून गंभीर दखल

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** सिंदेवाही परिक्षेत्रातील गुंजेवाही येथील वनक्षेत्रात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या ४ महिलांचा वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेची राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी गंभीर दखल घेतली आहे. कवडूबाई दादाजी मोहूर्ले (वय ४५), अनिताबाई दादाजी मोहूर्ले (वय ४०), सुनिता कौशिक मोहूर्ले (वय ३८) आणि संगीता संतोष चौधरी (वय ५०) या चारही महिलांच्या निधनाबद्दल त्यांनी तीव्र शोक व्यक्त करत, या दुःखद प्रसंगात मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली आहे. या घटनेत योगिता चंदपाल जेगटे (रा. वरवट वय ४५) ही महिला जखमी झाली. आ. मुनगंटीवार यांनी हे केवळ चार कुटुंबांवर आलेले संकट नसून वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाचे अत्यंत गंभीर आणि चिंताजनक स्वरूप असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी वन विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत मिळावी, यासाठी 'निगेटिव्ह ट्रेझरी सिस्टिम' लागू करण्याची मागणी केली. तसेच मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित पूर्वसूचना प्रणाली, स्मार्ट मॉनिटरिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता अधोरेखित केले. त्याचवेळी अशा घटनांकडे केवळ अपघात म्हणून न पाहता भविष्यातील गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज असल्याचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. आजच्या बदलत्या परिस्थितीत पारंपरिक उपाययोजनांसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची अत्यावश्यक गरज बनली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन सर्व्हेलन्स, सेन्सर आधारित अलर्ट सिस्टीम, रिअल-टाईम ट्रॅकिंग, जंगल परिसरातील स्मार्ट मॉनिटरिंग आणि नागरिकांना तात्काळ धोक्याची पूर्वसूचना देणारी यंत्रणा विकसित केल्यास अशा दुर्घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. वन विभागाने या घटनेकडे केवळ एक दुर्घटना म्हणून न पाहता, भविष्यातील मोठा इशारा म्हणून गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

# वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथे समर्पित ऑबेसिटी क्लिनिकची सुरुवात




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२२, मीरा रोड :** भारतात झपाट्याने वाढत असलेल्या लठ्ठपणाच्या समस्येला तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत वोक्हार्ट हॉस्पिटल्सने आपल्या मीरा रोड येथील रुग्णालयात समर्पित ऑबेसिटी क्लिनिक सुरू केले आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथील हे नवीन केंद्र लठ्ठपणा, मेटाबॉलिक विकार आणि वजनाशी संबंधित आरोग्य समस्यांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना वैज्ञानिक आणि सर्वसमावेशक उपचार उपलब्ध करून देणार आहे.

शहरी भारतात लठ्ठपणाचे प्रमाण वेगाने वाढत असल्याने वोक्हार्टहॉस्पिटल्सने या क्लिनिकची रचना मल्टिडिसिप्लिनरी पद्धतीने केली आहे. येथे प्रगत वैद्यकीय उपचार, बॅरिएट्रिक सर्जरी, न्यूट्रिशन काउन्सेलिंग, लाइफस्टाइल मॅनेजमेंट आणि दीर्घकालीन रुग्ण सहाय्य या सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध असतील.

भारतामध्ये प्रौढांसोबतच मुलांमध्येही लठ्ठपणाचे प्रमाण वाढत आहे. बदलती जीवनशैली, ताणतणाव, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि शारीरिक हालचालींमध्ये घट ही त्यामागची प्रमुख कारणे आहेत. जागतिक आरोग्य अहवालांनुसार, गेल्या दोन दशकांत भारतातील लठ्ठपणाचे प्रमाण जवळपास दुप्पट झाले आहे. त्यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि फॅटी लिव्हर यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. विशेषतः शहरी भागातील तरुणांमध्ये ही समस्या अधिक चिंताजनक बनत आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथील ऑबेसिटी क्लिनिकमध्ये टाइप-२ मधुमेह, उच्च रक्तदाब, स्लीप ॲपनिया, फॅटी लिव्हर, सांधेदुखी आणि हृदयविकाराचा धोका यांसारख्या लठ्ठपणाशी संबंधित आजारांवर विशेष उपचार केले जाणार आहेत.

यावेळी वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथील कन्सल्टंट मेटाबॉलिक आणि बॅरिएट्रिक सर्जन डॉ. राजीव मानेक म्हणाले, लठ्ठपणा ही केवळ वजन वाढण्याची समस्या नाही, तर ती व्यक्तीच्या संपूर्ण आरोग्यावर आणि जीवनमानावर परिणाम करणारी गंभीर वैद्यकीय स्थिती आहे. अनेक रुग्ण सामाजिक दबाव, वजन कमी करण्याचे वारंवार अपयशी प्रयत्न आणि गंभीर आरोग्य समस्यांमुळे त्रस्त असतात. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथे सुरू करण्यात आलेल्या या समर्पित ऑबेसिटी क्लिनिकच्या माध्यमातून आम्ही रुग्णांना वैज्ञानिक, संवेदनशील आणि वैयक्तिक उपचारांचा मार्ग उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहोत.

**ते पुढे म्हणाले :** आधुनिक बॅरिएट्रिक आणि मेटाबॉलिक उपचारांमुळे जगभरातील रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत. योग्य वैद्यकीय मार्गदर्शनामुळे रुग्णांना दीर्घकालीन वजन नियंत्रण आणि लठ्ठपणाशी संबंधित आजारांपासून मुक्ती मिळू शकते.

**वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोडचे सेंटर हेड डॉ. सुशील कुमार म्हणाले :**

ऑबेसिटी क्लिनिकची सुरुवात ही भारतातील वेगाने वाढणाऱ्या आरोग्य समस्यांपैकी एक असलेल्या लठ्ठपणावर उपाययोजना करण्याच्या वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. रुग्णांना त्यांच्या घराजवळ प्रगत उपचार, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि दीर्घकालीन आरोग्य सहाय्य उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथील या ऑबेसिटी क्लिनिकमध्ये डॉ. विमलेश मिश्रा (कन्सल्टंट फिजिशियन), डॉ. इम्रान खान (हेड – फिजिओथेरपी) आणि रिया देसाई (हेड – न्यूट्रिशन आणि डायटेटिक्स) हे देखील तज्ज्ञ टीमचा भाग असतील. ही टीम रुग्णांना सर्वसमावेशक आणि वैयक्तिक लठ्ठपणा व्यवस्थापन सेवा देणार आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे हे ऑबेसिटी क्लिनिक बॅरिएट्रिक सर्जरी, एंडोक्रिनोलॉजी, डायटेटिक्स, फिजिओथेरपी, सायकॉलॉजी आणि क्रिटिकल केअर तज्ज्ञांना एकत्र आणून प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिक उपचार योजना तयार करणार आहे.

या ऑबेसिटी क्लिनिकच्या माध्यमातून वोक्हार्ट हॉस्पिटल्स मुंबईच्या पश्चिम उपनगरांमध्ये प्रगत आरोग्यसेवा अधिक मजबूत करत असून, विशेष लठ्ठपणा उपचार सेवा अधिक सुलभ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आहे. पत्रकार परिषदचे सूत्रसंचालन उमेश कोळंबकर ह्यांनी केले.

# ऑनलाईन औषध विक्रीच्या निषेधार्थ केमिस्ट दुकानदारांचा मोर्चा

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२२, मिरा-भाईंदर :** ऑनलाइन मेडिसिन विक्रीला विरोध दर्शवण्यासाठी आज देशभरातील सुमारे १२ लाख केमिस्ट दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवून संप पुकारला. ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट या संघटनेच्या आवाहनानुसार हा देशव्यापी बंद पाळण्यात आला.

**भाईंदरमधील मोर्चा :** मिरा-भाईंदर केमिस्ट असोसिएशनच्या वतीने भाईंदर पूर्व येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या भाईंदर पश्चिम ते तहसीलदार भाईंदर कार्यालयापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात आला. शेकडो केमिस्ट बांधव व कर्मचारी या मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चा चे नेतृत्व मिरा भाईंदर औषध दुकान अध्यक्ष अरविंद जैन, सचिव साहेबराव यादव, कोषाध्यक्ष सुरेश चौधरी ह्यांनी केले.

ऑनलाइन औषध विक्री बंद करा, रुग्णांच्या जीवाशी खेळ थांबवा, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे नकोत अशा घोषणा देत मोर्चेकऱ्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

**केमिस्ट संघटनेचे म्हणणे :** संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देताना सांगितले की, ऑनलाइन कंपन्या कोणतीही तपासणी न करता सर्रास औषधे विकत आहेत. नकली औषधे, चुकीचा डोस, व्यसनाधीन औषधांची विक्री यामुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ड्रग अँड कॉस्मेटिक कायद्याचे उल्लंघन होत आहे. स्थानिक केमिस्ट बेरोजगार होत आहेत.

**मागण्या :**

१.ऑनलाइन औषध विक्रीवर तात्काळ बंदी घालावी.

२. ई-फार्मसीसाठी कडक नियमावली लागू करावी.

३.फक्त नोंदणीकृत केमिस्ट दुकानांतूनच औषध विक्रीला परवानगी द्यावी.




तहसीलदार कार्यालयाने निवेदन स्वीकारून ते वरिष्ठ पातळीवर पाठवण्याचे आश्वासन दिले.

**परिणाम :**

आजच्या बंदमुळे देशभरात अत्यावश्यक सेवा वगळता सर्व मेडिकल दुकाने बंद होती. रुग्णांची गैरसोय झाली असली तरी, ऑनलाइन विक्रीच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करणे हा आमचा हेतू होता, असे संघटनेने स्पष्ट केले.

# अनेक शासकीय कार्यालयातील सीसीटीव्ही बंद अवस्थेत

## सीसीटीव्ही निगराणीचा नुसता दिखावा; कार्यालयाची सुरक्षा रामभरोसे

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२२, सोलापूर :** शासकीय कार्यालयातील महत्त्वाची दस्तऐवज, महत्त्वाच्या फायली गहाळ होण्याचे प्रकार रोखणे, या दस्तऐवजाची चोरी रोखणे, अधिकारी, कर्मचारी यांच्यावर होणारे हल्ले तसेच कार्यालयीन शिस्तीसाठी राज्य शासनाने सर्व शासकीय कार्यालय व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला. परंतु अनेक शासकीय कार्यालयाचे सीसीटीव्ही बंद आहेत, त्याचा नुसताच दिखावा दिसून येतोय.



सोलापूर शहरात व ग्रामीण जिल्हाधिकारी, महानगरपालिका, जिल्हा परिषद, सिव्हिल हॉस्पिटल, वैद्यकीय महाविद्यालय यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, कामगार कल्याण केंद्र, वन विभाग, सिटीसर्वे, पोलीस आयुक्तालय, पोलीस अधीक्षक,

यासह शेकडो ठिकाणी शासकीय कार्यालय कार्यरत आहेत. या ठिकाणी अधिकारी कर्मचाऱ्यांनी नागरिकांचा तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा नेहमीच वावर आहे. एखादा अनुचित प्रकार घडू नये. याकरिता राज्य शासनाने सर्व शासकीय कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश दिले. नव्याची नवलाई या म्हणीप्रमाणे अनेक ठिकाणी लावले गेलेले सीसीटीव्ही सद्यस्थितीत बंद अवस्थेत असल्याचे दिसते. तर काही ठिकाणी नादुरूस्त आहेत.

सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांच्या कालावधीत २०१४ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व विभागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. परंतु अलीकडे बऱ्याच कार्यालयातील हे सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने शासकीय कार्यालयातील

### चौकशीत पोलिसांना अडथळा

● शासकीय कार्यालयात एखादा अनुचित प्रकार घडला, एखाद्याकडून शासकीय अधिकाऱ्यांवर हात उचलला किंवा त्याला काळेफसले किंवा सरकारी कामात हस्तक्षेप केला तर अशा प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांना तेथील सीसी टीव्ही फुटेज अतिशय महत्त्वाची बाब ठरते. पण दुर्दैव असे की अनेक शासकीय कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने पोलिसांना तपासासाठी अडचणीचे ठरते.

### नावालाच फलक..!

● आपण सीसीटीव्हीच्या निगराणी खाली आहात' असा बोर्ड बऱ्यास शासकीय कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर लटकवलेला असतो. परंतु प्रत्यक्षात येथील सीसीटीव्ही कॅमेरेच बंद अवस्थेत असल्याने त्याचा काहीही उपयोग होत नाही. हे फलक नुसते नावालाच असतात.

सुरक्षा व्यवस्था व यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सात रस्ता येथे असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे समाज कल्याण विभागासह जात पडताळणी, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळासह इतर चार महामंडळाची कार्यालय आहेत. या ठिकाणी नागरिकांची नेहमी गर्दी असते परंतु येथे असलेल्या बऱ्याच कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्तीच्या नावाखाली अनेक महिन्यापासून बंद आहेत. जात पडताळणी कार्यालयात व तहसीलदार ऑफिस तर नेहमीच नागरिकांची ये-जा सुरू असते.

या कार्यालयात अनेक महत्त्वाचे दस्तऐवज आहेत त्यामुळे या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नितांत गरज आहे. सीसीटीव्ही असल्यामुळे कर्मचारी वर्गही आपल्या टेबलवर काम करत असतो. सीसीटीव्ही नसल्याने बरेच कर्मचारी कार्यालयात कमी आणि बाहेर जास्त असतात. यावर उपाय करणे गरजेचे आहे.

# थोडक्यात

## ठाणे जळतंय, जवान मात्र घटतायत !

### २२ लाखांच्या नागरिकांच्या सुरक्षेला फक्त १७४ अग्निशमन कर्मचारी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, ठाणे :** ठाणे शहरातील तब्बल २२ लाख नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ १७४ अग्निशमन कर्मचाऱ्यांवर असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

वाढती लोकसंख्या, उंच इमारती आणि वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ठाणे अग्निशमन दलावर मोठा ताण निर्माण झाला आहे. मंजूर पदांच्या तुलनेत अत्यल्प कर्मचारी कार्यरत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य आणि आग नियंत्रणात आणणे कठीण होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

२०१६ मध्ये महासभेत मंजुरी मिळूनही आणि नगरविकास विभागाच्या निर्देशानंतरही अग्निशमन दलातील ही महत्त्वाची भरती प्रक्रिया अजूनही रखडलेलीच असल्याने ठाणेकरांच्या सुरक्षेचा प्रश्न आता गंभीर बनला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अग्निशमन विभागात तातडीने भरती करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## माथेरानच्या सुशोभीकरण आणि पर्यटन वाढीसाठी लोकप्रतिनिधींचे नियोजनबद्ध प्रयत्न




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२२, माथेरान :** माथेरानच्या विकासासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, आमदार महेंद्रशेठ थोरवे तसेच नियोजन, पर्यटन व पर्यावरण समितीचे सभापती तथा नगरसेवक शिवाजी शिंदे हे सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी विकासकामांबाबत दाखवलेली तळमळ आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा नागरिकांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे.

माथेरान अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यटकांसाठी आकर्षक व्हावे या उद्देशाने युज अँड थ्रो प्लास्टिक बंदीसारखा पर्यावरणपूरक निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मुख्य बाजारपेठेतील झाडांभोवती सुशोभीकरण, पर्यटक व नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था आणि बाजारपेठेचा कायापालट करण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलली जात आहेत.

पर्यटन वाढीसाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतला असून त्यामुळे पर्यटकांना अधिक सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. तर या विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी मिळावा यासाठी आमदार महेंद्रशेठ थोरवे यांच्याकडे मागणी करण्यात आली असून त्यांनीही माथेरानच्या सुशोभीकरणासाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे.

नियमांच्या अधीन राहून माथेरानचे नैसर्गिक सौंदर्य जपत शहराचा विकास करण्याचा प्रयत्न सुरू असून लोकप्रतिनिधींच्या एकत्रित प्रयत्नांमुळे बदलत्या आणि आकर्षक माथेरानकडे नागरिक आशेने पाहत आहेत.

## जिल्हास्तरीय कृषी अधिकाऱ्यांची चिमूर तालुक्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतात भेट




**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२२, चिमूर :** तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी यांनी उद्यान पंडित पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविले त्या अनुषंगाने तपासणी करिता जिल्ह्याचे पथक चिमूर तालुक्यातील सावरगाव येथील हेमंत शेदरे आणि शिरपूर येथील लिलेश्वर कोसे यांच्या शेतावर भेट देऊन तपासणी करण्यात आली.व पिक आणि फळबाग लागवड बदल माहिती घेतली. यावेळी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे चंद्रपूर, थोरात, मंडळ कृषी अधिकारी निखारे, आडे, सहाय्यक कृषी अधिकारी डाहाके, कृषी सहायक गणेश उमाटे, येसनकर, किनकिने, घाटे, शेतकरी लिलेश्वर कोसे, निकोडे, दिवाकर डाहारे, किशोर डाहारे, विलास बोरकर, राजु डाहारे उपस्थित होते.

## जैवविविधतेचा समतोल राखणे काळाची गरज माथेरान इको टुरिझम साठी आदर्श : अनुकेतन सावंत



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२२, माथेरान :** २२ मे रोजी जगभरात जागतिक जैवविविधता दिन साजरा करण्यात आला. पर्यावरणातील सजीवसृष्टीचे महत्त्व, निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदल यामुळे जैवविविधतेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले असून पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज बनली आहे.

नैसर्गिक हिरवाई, विविध वनस्पती, पक्षी आणि प्रदूषणमुक्त वातावरणामुळे माथेरान हे महत्त्वाचे इको टुरिझम स्थळ मानले जाते. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने माथेरानचे महत्त्व विशेष असून येथील नैसर्गिक संपत्ती जपणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

याबाबत पर्यावरणप्रेमी अनुकेतन सावंत यांनी सांगितले की, जैवविविधता ही निसर्गाची अमूल्य देणगी आहे. मधमाशी, कीटक, वनस्पती किंवा वन्यजीव प्रत्येकाची इको सिस्टिममध्ये महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे जैवविविधतेचा समतोल राखणे हे मानवी जीवनासाठी अत्यावश्यक आहे. पर्यावरणपूरक पर्यटन आणि निसर्ग संवर्धन याला प्राधान्य दिल्यास माथेरान हे देशातील आदर्श शाश्वत इको टुरिझम डेस्टिनेशन ठरू शकते. त्यांनी पुढे सांगितले की, जैवविविधतेने समृद्ध माथेरानची तुलना केवळ मौजमजेच्या रिसॉर्ट टुरिझमशी होऊ शकत नाही. पर्यावरण जपणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.